# बृहन्मुंबईमहानगरपालिका

## माहितीचा अधिकार नियम (4)(1)(बी)

## पुस्तिका क्र.2

## वर्ष 2020-21

2 **संस्थेची रचना, कार्यपध्दती व कर्तव्ये**

| | | |
|---|---|---|
| 1 | उप प्रमुख अभियंता (यां.ववि.) मलनि:सारण प्रकल्प | 01 पद |
| 2 | कार्यकारी अभियंता (यां.ववि.) मलनि:सारण प्रकल्प | 06 पदे |
| 3 | सहाय्यक अभियंता (यां.ववि.) मलनि:सारण प्रकल्प | 10 पदे |
| 4 | दुय्यम अभियंता (यां.ववि.) मलनि:सारण प्रकल्प | 16 पदे |
| 5 | प्रशासकीय अधिकारी | 01 पद |
| 6 | मुख्यलिपिक | 04 पद |
| 7 | वरिष्ठ लघुलेखक | 01 पद |
| 8 | कनिष्ठ लघुलेखक | 04 पदे |
| 9 | लिपिक | 08 पदे |
| 10 | नाईक | 01 पद |
| 11 | शिपाई | 10 पदे |
| | **एकूणपदे** | **62 पदे** |

**कार्यालयाचा पत्ता :** उप प्रमुख अभियंता (यां.ववि.) मलनि:सारण प्रकल्प यांचे कार्यालय,
इंजिनियरींग हब बिल्डींग, 2 रा मजला,
डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई- 400 018.
दूरध्वनी क्र.24958001/24958101(विस्तारीत क्र.7995)
24953674/24928625
फॅक्स क्र. ----------

**प्रधानकार्य व कर्तव्ये**

उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) मलनिःसारण प्रकल्प हे खाते प्रमुख अभियंता (मुंबई मलनिःसारण प्रकल्प) खात्याच्या अखत्यारीत कार्यरत आहे.असून प्रमुख अभियंता (मुं.म.प्र.), प्रमुख अभियंता (म.प्र.) व प्रमुख अभियंता (म.प्रचालन) या खात्यामार्फत हाती घेण्यात येणा-या विविध मलनि:सारण योजनांतर्गतची यांत्रिकी व विद्युत अभियांत्रिकी व त्या अनुषंगाने येणारी स्थापत्य अभियांत्रिकी कामे व नियोजन, संकल्प चित्रे तयार करणे व त्या कामांची अंमलबजावणी करणे यासारखी कामे हया खात्यामार्फत केली जातात. सद्यस्थितीत या कार्यालयामार्फत खालील कामे सुरू आहेत.

1 वरळी, वांद्रे, मालाड, वर्सोवा, भांडूप, घाटकोपर व धारावी येथील मलजल प्रक्रिया केंद्रे अद्ययावत करण्यासाठी निविदा मागविण्याची जाहिरात ऑगस्ट 2020 मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. निविदा प्राप्त झाल्या असून निविदांची छाननी सुरू आहे. मालाड सोडून इतर सर्व कामांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत व त्यांची किंमतीची पाकिटे उघडण्यात आली आहेत. पुढील मुल्यांकनाची प्रक्रिया सुरु आहे.

2 मालाड मलजल प्रक्रिया केंद्र उभारणीच्या कामाची पुनर्निविदा प्रक्रिया सुरू आहे.

3 कुलाबा मलजल प्रक्रिया केंद्राच्या कार्यान्वितीकरणानंतर प्रचालन व परिरक्षणाचे काम सुरू आहे. त्याचप्रमाणे वल्लभनगर चिंचपोकळी येथील उदंचन केंद्रांचे प्रचालन व परिरक्षणाचे काम सुरू आहे.

4 मिठी नदी पुनर्निमाण प्रकलपाच्या टप्पा-1 अंतर्गत उदंचन केंद्र व मलप्रक्रिया केंद्रे उभारण्याचे काम सुरू आहे. तसेच पवई तलावातील सांडपाणी प्रदूषण रोखण्याच्या प्रकल्पांतर्गत पेरूबाग येथे उभारण्यात येणा-या मलप्रक्रिया केंद्राचे काम सुरू आहे.

5 वर्सोवा येथील उदंचन केंद्र, मालाड येथील उदंचन केंद्र उभारणीचे काम सुरू आहे.

6 वर्सोवा तसेच एस.व्ही. रोड सिवर टनेलचे (बोगद्याचे) काम सुरू आहे.

7 मालाड येथील प्राधान्य मल बोगदे (PST-I & PST-II) चे काम निविदा टप्प्यात आहे.

8 मिठी नदीतील सांडपाणी अडवून धारावी येथील प्रस्तावित मलजल प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहून नेण्यासाठी बांधावयाच्या सिवर टनेल (बोगदा) च्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत.

9 वरील कामांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागार सेवांचे काम सुरू आहे. तसेच मालाड येथील प्रस्तावित मलजल प्रक्रिया केंद्रासाठी सल्लागार सेवा नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे.

10 भांडूप उदंचन केंद्र तसेच घाटकोपर उदंचन केंद्राच्या अद्ययावतीकरणासाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे.

सही/-

**उपप्रमुख अभियंता (यां.ववि.)**

**मलनि:सारण प्रकल्प**